# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २७ । अंक २१७ । बुधवार, दि.२ जुलै २०२५ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर


## बिस्वा सरमांवर हल्ल्याचा प्रयत्न

**गोलाघाट ।** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा हे आज गोलाघाटच्या दौऱ्यावर असताना त्यांच्यावर हल्ला करण्याच्या उद्देशाने त्यांच्या ताफ्यावर पाण्याची बाटली फेकण्यात आल्याची घटना समोर आली आहे. गोमुखी डेअर प्रकल्पामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या विरोधात येथे काँग्रेसचे काही कार्यकर्ते सरमा यांच्याविरोधात आंदोलन करत होते. तेव्हा ही घटना घडली. दरम्यान, हिमंत बिस्वा सरमा यांच्या ताफ्यावर जी बाटली फेकण्यात आली ती बाटली स्प्राईट या शितपेयाची होती, अशी माहिती समोर आली आहे.

## आ.नाना पटोले निलंबित

**मुंबई ।** शेतकऱ्यांचा सातत्याने अपमान करणाऱ्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजप आमदार बबनराव यादव लोणीकर यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस आमदार नाना पटोले मंगळवारी विधानसभेत आक्रमक झाले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनापर्यंत धाव घेत पटोले यांनी अध्यक्षांच्या समोरील राजदंडाला स्पर्श केला. समज देऊन पटोले ऐकत नसल्याने शेवटी नार्वेकर यांनी त्यांच्यावर दिवसभरासाठी निलंबनाची कारवाई केली.

## संपादकीय

### भुर्दंड विद्यार्थ्यांना का?

अकरावी प्रवेश प्रक्रियेचे यावर्षीही तीनतेरा वाजले आहेत. शैक्षणिक वेळापत्रक कोलमडेल, अशीच चिन्हे आहेत. पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाली असली तरी तिच्या आणखी काही फेऱ्या होतील. दहावीची परीक्षा मुले महत्प्रयासाने उत्तीर्ण होतात. शालेय बंधनाच्या जगातून तुलनेने मुक्त वातावरणातील महाविद्यालयात जाण्यास उत्सुक असतात, पण शालेय विभाग मात्र प्रवेशप्रक्रियेत दरवर्षीच 'अनुत्तीर्ण' होतो. परिणामी दहावी परीक्षा निकालाच्या ताणाची जागा अकरावी प्रवेशप्रक्रिया घेते. प्रवेश मिळेल का? तो मनपसंत महाविद्यालयांत मिळेल का? प्रक्रिया वेळेत पार पडेल का? उशीर झाल्यावर अभ्यास कधी करणार? असे अनेक प्रश्न विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना सतावतात. त्यांची उत्तरे मिळण्यासाठी ऑगस्ट-सप्टेंबर महिना उजाडावा लागतो. त्यामुळे महाविद्यालयाची पायरी चढता-चढताच मुलांना अकरावीच्या सहामाही परीक्षेची तयारी करावी लागते. यावर्षी एकवीस लाख विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांच्या फरफटीला शिक्षण विभाग जबाबदार आहे. वास्तविक अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात प्रवेशप्रक्रिया अचूक पार पडायला हवी, पण यावेळी ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाल्याच्या काही वेळातच ती बंद पडली. नोंदणीच झाली नाही. काही दिवसांनी ती सुरु झाली तर राज्यातील सगळ्या महाविद्यालयांतील गुणांची मर्यादा (कट ऑफ) दिसत नव्हती. ती अजूनही सुरळीत झालेली नाही. एखादी तांत्रिक अडचण उद्भवणे समजण्यासारखे आहे. मात्र अडचणींचा अडथळा कसा राहतो? दरवर्षी शैक्षणिक वेळापत्रक कोलमडते; तरीही सुधारणा होतच नाहीत. मागच्या पानावरुन सारे पुढे सुरुच! शिक्षण विभागासाठी हे नैमित्तिक काम असले तरी विद्यार्थ्यांसाठी मात्र तो ताणाचा मुद्दा ठरतो. दिवसेंदिवस ही प्रक्रिया प्रचंड वेळखाऊ आणि किचकट बनत चालल्याचा अनुभव विद्यार्थी आणि त्यांचे पालक घेत आहेत. प्रवेश कधी होणार? ते मुलांना कळत नाही. महाविद्यालय तोपर्यंत सुरु होत नाहीत. हा ताण मुलांनी का सहन करावा? कामे बिनचूक होण्यासाठी तंत्रज्ञानाचा स्वीकार केला गेला, पण प्रवेशप्रक्रिया वेळेत आणि पान २ वर

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2300 |
| नवती (२) | : 2100 |





# मुख्यमंत्रिपदाचे करनाटक!

## सिद्धरामय्या-शिवकुमारांमध्ये संघर्ष शिगेला



**बेंगळुरु ।** काही दिवसांपासून सुरू असलेला कर्नाटक काँग्रेस पक्षातील अंतर्गत कलह मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यामध्ये राजकीय संघर्ष सुरू असून अडीच वर्षाच्या मुख्यमंत्रीपदावरून हा वाद वाढला आरहे.त्यामुळे या संघर्षाच्या चर्चांनंतर काँग्रेस हायकमांडने याची दखल घेत अखेर काँग्रेसचे नेते रणदीप सुरजेवाला कर्नाटक दौऱ्यावर पाठविल्याची चर्चा आहे.

काँग्रेस हायकमांडने रणदीप सुरजेवाला यांना कर्नाटकला पाठवले असून ते काँग्रेस आमदारांचा आढावा घेण्यासाठी आल्याची चर्चा आहे. दरम्यान, कर्नाटकला नवे मुख्यमंत्री मिळणार का? सरकारमध्ये फूट पडलीये का? किंवा सरकारमध्ये काही फेरबदल होणार आहेत का? असे सवाल उपस्थित करण्यात आले येत आहेत. पण या सर्व प्रश्नांवर आता काँग्रेसने खुलासा करत या चर्चा फेटाळून लावल्या आहेत. तसेच सिद्धरामय्या हे रणदीप सुरजेवाला यांनी या चर्चांवर पत्रकार परिषद घेत अशा प्रकारचे काही घडणार नसल्याचे सांगत चर्चा फेटाळून लावल्या आहेत. तसेच आपला कर्नाटक दौरा हा फक्त संघटनात्मक आढाव्याचा एक भाग असून संभाव्य नेतृत्व बदल किंवा मंत्रिमंडळ फेरबदलाची अशी कोणतीही प्रक्रिया सुरू नसल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. काँग्रेस आमदार इक्बाल हुसेन यांनी म्हटले की, उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घ्यावीत, अशी मागणी जवळपास १०० आमदारांची आहे. हे फक्त नेतृत्व बदलाबाबत नाही, तर बहुतेक आमदारांना प्रभावी प्रशासन हवे आहे, काँग्रेस पक्ष मजबूत करण्यासाठी आणि अनेक आंदोलनांचे नेतृत्व करण्यासाठी डीके शिवकुमार यांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करत डीके शिवकुमार यांना मुख्यमंत्रिपदाची संधी मिळण्यासाठी ते पात्र असल्याचे मत देखील हुसेन यांनी व्यक्त केले आहे. मात्र, या चर्चांना सुरजेवाला यांनी पूर्णविराम दिला आणि म्हटले की, जर कोणत्याही आमदारांचे काही प्रश्न असतील तर ते पक्षात आणि सरकारमध्ये सोडवले पाहिजेत



## ७५ वर्षांचे काँग्रेसमध्ये 'तप' अन् 'भाजपा'त दाखल!

### मी जुन्या लोकांना अडसर नाही-कुणाल पाटील

**मुंबई ।** धुळे व जळगावचे लोक खूप समाधानी आहोत. दोन प्रेमाचे शब्द बोलले आणि सन्मान पूर्वक वागणूक दिली तरी बस. तुम्हाला अडसर होईल अशी कुठलीही घटना घडणार नाही, असा मी शब्द भाजपच्या सर्व जुन्या लोकांना देतो. भाजपने या ठिकाणी पक्ष टिकवून ठेवला, याची मला जाणीव आहे. भाजपात जायचे म्हणजे मंत्र व वेद आले पाहिजे. एक मंत्र लिहून आणला आहे. मी पण धार्मिक आहे. जेव्हापासून लाट आली आहे तेव्हापासून जास्तच देव देव करत आहे. तुम्ही मला चांगले बघितले तर मी पण तुम्हाला चांगला दिसेल. असे म्हणत काँग्रेसचे कार्याध्यक्ष राहिलेले माजी आमदार कुणाल पाटील यांनी आज भाजपात प्रवेश केला.

भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर माजी आमदार कुणाल पाटील यांनी म्हटले की, आज महत्वाचा दिवस आहे. आपण ३ पिढ्यांचा वारसा सोडून सोडून भाजपमध्ये जात आहे हे खरे आहे. माझे वडील आमदार होते हे सर्वांनी पाहिलेले आहे. त्यांनी मला विकासाचा वारसा दिला आहे. पान २ वर

## दोन वर्षांत ३.५ कोटी नोकऱ्या!

**नवी दिल्ली ।** मोदी सरकारने एम्प्लॉयमेंट लिंक्ड इनसेंटिव्ह योजनेला मंजुरी दिली आहे. यानुसार येत्या दोन वर्षांत ३.५ कोटींहून अधिक रोजगार उपलब्ध केले जाणार आहेत. सर्वच क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती करणे, नोकऱ्यांची क्षमता वाढविणे यासह सामाजिक सुरक्षा वाढविण्याची तयारी केली जात आहे. देशातील बेरोजगारी कमी करणे हे या ईएलआय योजनेचे मुख्य उद्दीष्ट आहे. नवीन नोकरी करणाऱ्यांना म्हणजेच पहिल्यांदा नोकरी करणाऱ्यांना महिन्याचा पगार दोन टप्प्यांत दिला जाणार आहे. यासाठी १५,००० रुपयांपर्यंतचा मासिक पगार गृहीत धरण्यात आला आहे.

## सर्वोच्च न्यायालयात पहिल्यांदाच आरक्षण

**नवी दिल्ली ।** सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयाअंतर्गत आता सर्वोच्च न्यायालयातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि पदोन्नतीसाठी आरक्षण लागू करण्यात आले आहे. या निर्णयासंबंधीचे परिपत्रक २४ जून रोजी जारी करण्यात आले आहे. या परिपत्रकाच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयातील सर्वच कर्मचाऱ्यांना या नव्या निर्णयाची माहिती देण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयातील हे मॉडेल आरक्षण रोस्टर तसेच अंतर्गत इमेल नेटवर्कवर अपलोड करण्यात आले आहे.

## भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण

**मुंबई ।** गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्र भाजपाची धुरा कोणाच्या हाती दिली जाणार, याची सर्वांनाच उत्सुकता लगली होती. आता मात्र ही उत्सुकता संपली आहे. आज भाजपाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमात त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.



मुंबई महानगरपालिकेची निवडणूक तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाला राज्यात एक कायमस्वरुपी प्रदेशाध्यक्ष मिळावा, अशी भावना व्यक्त केली जाऊ लागली होती.

# वाजत गाजत गुलाल उधळत या!

## १९ वर्षांनंतर ठाकरे बंधू पहिल्यांदाच एकत्र येणार!

**मुंबई ।** हिंदी सक्ती विरोधाच्या निमित्ताने राज आणि उद्धव हे ठाकरे बंधू अनेक वर्षांनंतर पहिल्यांदाच एका व्यासपीठावर दिसणार आहेत. हिंदी भाषेबाबतचा शासन निर्णय रद्द करत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करावी लागली. मात्र असे असले तरी ५ जुलै रोजी मुंबईत आम्ही मराठीचा विजय मिळावा घेऊ, अशी घोषणा मनसे आणि



ठाकरेंच्या शिवसेनेकडून करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर मराठी जनांना आवाहन करण्यासाठी राज आणि उद्धव ठाकरेंकडून एक पत्रकही जारी करण्यात आले आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी संयुक्तपणे जारी केलेल्या पत्रात म्हटले आहे की, मराठी मातांनो, भगिनींनो आणि बांधवांनो, सरकारला नमवले का? तर हो नमवले. कोणी नमवले तर ते तुम्ही, मराठी जनांनी नमवले. आम्ही फक्त तुमच्या वतीने संघर्ष करत होतो. त्यामुळे हा आनंद साजरा करतानासुद्धा, आम्ही फक्त या पान २ वर

## शालार्थ घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी

**मुंबई ।** बनावट शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ घोटाळ्याचे पडसाद मंगळवारी विधानसभेत उमटले. हे प्रकरणे केवळ नागपूर जिल्ह्यात मर्यादित नसून राज्यातील इतर जिल्ह्यातही फोफावली असल्याची शंका आमदारांनी सभागृहात व्यक्त केली. अखेर याप्रकरणी राज्यव्यापी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत केली. या एसआयटीत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह सनदी अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात येईल. येत्या तीन ते चार महिन्यात एसआयटीला चौकशी अहवाल देण्याची सूचना करण्यात येईल. त्यानंतर



दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही भुसे यांनी सांगितले.

भाजपचे आमदार प्रवीण दटके यांनी नागपूर जिल्ह्यातील एक हजारहून अधिक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ आयडीमध्ये समाविष्ट करुन कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी आज विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या चर्चेत आमदारांनी या प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. दरम्यान, यावेळी आमदार मुफ्ती मोहम्मद इस्माईल यांनी नाशिक विभागातील शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची यादी जाहीर करतात, असे सांगितले.

## एसटी कर्मचाऱ्यांना आषाढीत मोफत भोजन

**मुंबई ।** आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप



सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आभाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत पान २ वर

## मुळक यांचे निलंबन मागे



**मुंबई ।** गेल्या वर्षी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात बंडखोरी केल्याने काँग्रेसमधून निलंबनाची कारवाई करण्यात आलेले माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक यांचे निलंबन काँग्रेसने मंगळवारी औपचारिकरित्या मागे घेतले. दिल्लीत पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुळक यांचे पुन्हा पक्षात स्वागत करून निलंबन मागे घेतल्याचे अधिकृतरित्या घोषित केले.

## शेलार यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक व्यवस्थापन समिती



**मुंबई ।** आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपने मोर्चेबांधणी सुरु केली असून निवडणूक व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी पक्षाचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीत फडणवीस यांचे निकटवर्ती मानले जाणारे आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांना स्थान न मिळाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

# एका फोनमुळे गेली पंतप्रधानांची खुर्ची

## थायलंडच्या राजकारणात उलथापालथ

**कंबोडिया ।** आशिया खंडात पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या थायलंडच्या राजकारणात उलथापालथ झाली आहे. थायलंडच्या न्यायालयाने मंगळवारी पंतप्रधान पैतोंगतार्न शिनावात्रा यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांच्या पदावरून हटवले आहे. कंबोडियाच्या एका नेत्यासोबत झालेल्या फोन कॉलची माहिती लीक झाल्याच्या प्रकरणी शिनावात्रा यांना त्यांच्या पदावरून काढण्यात आले आहे. २८ मे रोजी सीमावादानंतर शिनावात्रा यांनी एका वरिष्ठ कंबोडियन नेत्याशी फोनवर चर्चा केली होती. न्यायालयाने



कंबोडियासोबतच्या वादामधील त्यांच्या वर्तनाची चौकशी सुरू केली होती.

थायलंडच्या कोर्टाने याबाबत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, , न्यायालयाने ७-२ च्या बहुमताने प्रतिवादीला १ जुलैपासून पंतप्रधान पदाच्या कार्यभारातून निलंबित पान २ वर

### सैन्याला म्हटले प्रतिस्पर्धी

समोर आलेल्या रेकॉर्डिंगनुसार, जेव्हा पैतोंगतार्न यांनी कंबोडियाचे राजकारणी हुन सेन यांना सीमेवरील तणावावर चर्चा करण्यासाठी बोलावले, तेव्हा त्यांनी सेन यांना काका म्हटले आणि थाई लष्करी कमांडरला प्रतिस्पर्धी असे संबोधले. यामुळे त्यांच्यावर जोरदार टीका झाली. कंझर्व्हेटिव्ह खासदारांनी त्यांच्यावर कंबोडियासमोर झुकल्याचा आणि सैन्याला कमकुवत केल्याचा आरोप केला आहे.